# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**मंगळवार, दिनांक १९ मार्च, २०१३**
**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१२-२०१३ सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**चार : औचित्याचे मुद्दे - (असल्यास)**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री प्रताप सरनाईक,** एकनाथ शिंदे, दौलत दरोडा, राजन विचारे, रुपेश म्हात्रे, जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, विलास लांडे, लक्ष्मण जगताप, किसन कथोरे, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"ठाणे जिल्ह्यामध्ये अनेक नवीन वस्त्या उभ्या राहत असणे, त्यामुळे मध्य रेल्वेवर, परिवहन सेवेवर तसेच खाजगी वाहतुकीवर मोठ्या प्रमाणात परिणाम होत असून मध्य व पश्चिम रेल्वेला जोडणारी वाहतूक व्यवस्था निर्माण करणे गरजेचे असणे, त्यातच ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये घोडबंदर रोडवर मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत असून दिवसेंदिवस या परिसरात रहावयास येणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असणे, ठाणे-भिवंडी-कल्याण या शहरांना जोडणारी वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यासाठी दिनांक १५ मार्च, २००८ रोजी झालेल्या १२१ व्या बैठकीमध्ये या मार्गावर मोनोरेल मार्गाचा सुसाध्यता अभ्यास करण्यास तत्वत: मान्यता देण्यात येणे, सदर अहवाल तयार करण्यासाठी मे.राईटस लिमिटेड, नवी दिल्ली यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात येऊन त्यानुसार मोनोरेलचा मार्ग निश्चित करण्यात येणे व पहिला मार्ग म्हणून कापुरबावडी-भिवंडी-कल्याण असा मार्ग प्रस्तावित करण्यात येणे, सदर अहवालानुसार मोनोरेल मार्गाची लांबी २३.७५ कि.मी. असून यावर १७ स्थानके बांधण्यासाठी रुपये ३२७१ कोटी इतका खर्च अपेक्षित असणे, सदर मोनोरेल मार्गासाठी भिवंडी-निजामपूर, कल्याण-डोंबिवली व ठाणे महानगरपालिकेने संमतीदर्शक ठराव एमएमआरडीएकडे सादर करणे, ठाणे मोनोरेल प्रकल्पाला मिळणारा आर्थिक परतावा लक्षात घेता हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या परवडणारा नसल्याने शासनाने या प्रकल्पाबाबत अद्यापपर्यंत कोणताही निर्णय न घेणे, त्याचबरोबर ठाणे शहरातील घोडबंदर रोड परिसर झपाट्याने विकसित होत असून मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी व नवी मुंबई या चारही

महापालिकांची हद्द ठाणे महापालिकेला जोडत असल्याने ठाणे शहरामध्ये एमएमआरडीएने ठाणे स्टेशन ते तीन हात नाका व कापूरबावडी ते कासारवडवली हा मेट्रो मार्ग प्रस्तावित करणे, जेणेकरुन मिरा-भाईंदर शहरमार्गे दहिसर या मुंबईच्या वेशीवर व तीन हात नाकापासून मुलुंड म्हणजेच मुंबईच्या वेशीवर हा मुंबई व आसपासच्या शहरांना जोडणारा मार्ग प्रस्तावित करण्यात येणे, त्यासाठी मे.कन्सल्टींग इंजिनिअरिंग सर्विसेस (इंडिया) प्रा.लि. यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात येणे, त्यानुसार सन २०१२ मध्ये मेट्रो रेल मार्गाची लांबी १०.८७ कि.मी. ठरवून १८ स्थानके निश्चित करण्यात येणे, या महत्वाकांक्षी प्रकल्पाला रुपये २०९१ कोटी इतका खर्च येणार असून या मेट्रो रेलकरिता ठाणे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेनेही मान्यता देणे, तसेच कासारवडवली येथे मेट्रो रेल्वेच्या कारशेडसाठी ४० हेक्टर भूखंडही आरक्षित करण्यात येणे, त्यानंतर ठाणे मेट्रो प्रकल्पाचे बांधकाम व उत्पन्न लक्षात घेता हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सुसाध्य नसल्याने एमएमआरडीएने हा प्रस्ताव शासनाकडे अद्याप पाठविलेला नसणे, ठाणे हे मुंबईजवळचे अतिशय मोठे शहर असताना व शहरामध्ये नागरीकरण झपाट्याने होत असताना शासनाकडून वाहतुकीच्या बाबतीत प्राधान्य दिले गेले नसल्याने शहरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, एका बाजूला पुणे व पिंपरी-चिंचवड येथील मेट्रो प्रकल्पाला केंद्र सरकारकडून सहकार्य मिळणे तर राज्य शासनाकडून अनुमती देण्यात येणे, तर दुसऱ्या बाजूला नवी मुंबई महानगरपालिका सुद्धा मेट्रो प्रकल्प सन २०१४ मध्ये राबवित असणे, नागपूरसारख्या उपराजधानीमध्ये सुध्दा मेट्रो प्रकल्पाची कार्यवाही सुरु असणे आणि मुंबईमध्ये सुद्धा मेट्रो सुरु होणार असल्याचे चित्र सध्या निर्माण झालेले असणे, असे असताना ठाणे शहराकडे मात्र एमएमआरडीएचे साफ दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास येणे, मुंबईच्या वाहतुकीचा भार कमी करण्यासाठी ठाणे शहरात मेट्रो प्रकल्पाला मान्यता द्यावी अन्यथा २०९१ कोटी इतका असलेला खर्च भविष्यात ५००० कोटीवर जाण्याची शक्यता, ठाणे शहरात वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याने घोडबंदर रोडवरील शहरासाठी मोनो मेट्रो प्रकल्पास त्वरित मंजुरी देवून कामास सुरुवात करण्याची नितांत आवश्यकता, शासनाने यासंदर्भात करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार,** विवेक पाटील, श्रीमती मीनाक्षी पाटील, श्री.धैर्यशिल पाटील,कॅ.अभिजीत अडसूळ, प्रा. शरद पाटील, श्री. राजन साळवी, डॉ. संजय रायमुलकर, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या भूविकास बँकेमधून कर्ज वाटप बंद असणे, सदर कर्ज वाटप पूर्ववत करणेकरिता शासनाकडून नेमण्यात आलेल्या लघुगट समितीचे १ ते १८ मुद्दे दिनांक १९-१०-२०११ रोजी तत्वत: स्विकारणे, परंतु अद्यापपर्यंत उक्त मुद्यांवर अंमलबजावणी न होणे, राज्यातील जिल्हा भूविकास बँकेतील कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन गत १३ महिन्यांपासून थकीत असणे, तसेच निवृत्त कर्मचाऱ्यांची देय रक्कम २ वर्षांपासून देणे बाकी असणे, गत १४ वर्षांपासून बँकेचे कर्ज वाटप, व्यवसाय बंद असून ४ वर्षांपासून कर्मचाऱ्यांचे वेतन शासन, शिखर भूविकास बँक मुंबई ने अदा करणे, त्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांची आर्थिक पिळवणूक होणे, औषधोपचाराकरीता तसेच कौटुंबिक खर्चासाठी पैसा नसल्याने चिंताग्रस्त कर्मचाऱ्यांना जीव सुध्दा गमवावा लागणे, त्यामुळे जिल्हा भूविकास बँकेतील कर्मचाऱ्यांचे मागील १३ महिन्यांचे थकीत वेतन व निवृत्त कर्मचाऱ्यांच्या देय रकमा व इतर देणी त्वरित देण्याची नितांत आवश्यकता, चंद्रपूर जिल्हा भूविकास बँकेतील अन्यायग्रस्त

कर्मचाऱ्यांनी २० फेब्रुवारी,२०१३ पासून बँकेसमोर बेमुदत उपोषणास बसणे, परंतु अद्यापपर्यंत उक्त मुद्यांवर अंमलबजावणी न होणे, लघु गट समितीच्या शिफारशी तत्वत: मान्य करुन त्यावर शासनामार्फत यथायोग्य कार्यवाही चालू असल्याचे सांगणे,राज्यात पडलेला दुष्काळ व शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या रोखण्यासाठी भूविकास बँकेतून कर्ज वाटप तातडीने सुरु करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(३) **सर्वश्री. बापूसाहेब पठारे,** विलास लांडे, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"पुणे शहरात म्हाडाच्या अनेक इमारती धोकादायक अवस्थेत असणे, धोकादायक अवस्थेत असलेल्या इमारतींमध्ये हजारो कुटुंबांचे वास्तव्य असणे, मुंबईप्रमाणे पुणे शहरातील म्हाडा वसाहतीसाठी सन २०११ मध्ये २.५ एफ.एस.आय. मंजूर करण्यात आलेला असतानाही अद्यापपर्यंत सदर एफ.एस.आय. चे वाटप करण्यात आलेले नसणे, तसेच नियमावली तयार करण्यात आलेली नसणे, येथील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.गृहनिर्माण राज्यमंत्री यांचेकडे वारंवार मागणी केलेली असतानाही म्हाडा प्रशासनाकडून हेतुपुरस्सर अडथळा निर्माण केला जात असणे, पुण्यात असलेल्या म्हाडा वसाहतीतील सोसायट्यांचा कन्व्हेयन्स देण्यास म्हाडा कार्यालयाकडून विलंब होत असल्याने पुनर्विकासाअभावी येथील अनेक इमारती मोडकळीस आलेल्या असणे, म्हाडा वसाहतींचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चाललेला असणे, परिणामी म्हाडा वसाहतीतील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, मोडकळीस आलेल्या इमारतींमुळे रहिवाशांची सुरक्षितता धोक्यात आलेली असल्याने याबाबत सखोल चौकशी करुन म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास करणेबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर )**

**सहा : शासकीय विधेयक :-**

**पुर:स्थापनार्थ -**

सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक, २०१३.

**सात : सन २०१२-२०१३ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा दिवस) -**

(१) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.

(२) नगरविकास विभाग.

(३) गृहनिर्माण विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरित केल्याप्रमाणे)**

**[चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ५.३० वाजता]**

**आठ : अल्पकालीन चर्चा - (म.वि.स. नियम १०१ अन्वये) -**

**सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस, नाना पटोले, प्रा. राम शिंदे, श्री. एकनाथ खडसे (पाटील), डॉ. संजय कुटे, श्री. गोवर्धन शर्मा, डॉ. खुशाल बोपचे, श्री. सुभाष देसाई, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"दिनांक १४ फेब्रुवारी, २०१३ रोजी भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील मुरमाडी येथे तीन अल्पवयीन बहिणींवर बलात्कार होऊन त्यांची हत्या करण्यात आल्याची भीषण घटना घडणे, माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या अमानवीय घटनेमुळे भंडारा जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळणे, या प्रकरणातील आरोपींना पकडण्यात पोलीसांना अद्याप यश आलेले नसणे, शासनाच्या वतीने नऊ पोलिस पथकांची नियुक्ती करण्यात येणे, तथापि सदरची घटना घडून २६ दिवसांचा कालावधी उलटूनही खरे आरोपी अद्यापही मोकाटच असणे, आरोपींचा त्वरित शोध घेण्याकरिता व त्यांना कठोर शिक्षा होण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी तीव्र स्वरुपाचे आंदोलन करणे, या घटनेच्या निषेधार्थ मशाल मोर्चाही काढण्यात येणे, या घटनेबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने राज्य शासनाला अहवाल सादर करण्यासाठी नोटीस दिली असणे, या घटनेबाबत अलिकडेच प्राप्त झालेल्या शवविच्छेदन व फॉरेन्सिक अहवालात उघडकीस आलेली मतभिन्नता, शासनाने सदर घटनेचा तपास तात्काळ सीबीआयमार्फत करण्याची आवश्यकता व मुलींच्या आईला आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, तसेच दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ रोजी श्रीरामपूर, जि.अहमदनगर येथे दलित महिलेचे अपहरण करुन तिच्यावर अमानुष अत्याचार करणे, आरोपी दानीश शेख व अमन शेख हे उपनगराध्यक्षांचे पुतणे असणे, पोलिसांनी तब्बल चार दिवस गुन्हा नोंद न करणे व अतिरिक्त पोलिस अधीक्षकांच्या हस्तक्षेपानंतरच आरोपींना अटक होणे, सदर आरोपी संघटित गुन्हेगारी टोळी चालवित असल्यामुळे त्यांच्यावर संघटित गुन्हेगारी कायद्याप्रमाणे कारवाई होण्याची आवश्यकता, त्याचप्रमाणे कुही, जि.नागपूर येथे आदिवासी समाजाच्या घरावर दरोडा टाकून मुलीवर केलेल्या बलात्काराची नुकतीच घडलेली घटना, श्रीरामपूर व कुही येथील पीडित कुटुंबांनाही शासनाकडून कोणतीही मदत न मिळणे, एकूणच राज्यातील दलित, आदिवासी, इतर मागासवर्गीय महिलांवर वाढत असलेले अत्याचाराचे प्रमाण, त्यांच्या होणाऱ्या हत्येच्या घटना व या घटनांमधील आरोपींना अटक करण्यात शासनाला येत असलेले अपयश, दलित व आदिवासी समाजामध्ये याबाबत पसरत असलेला प्रचंड असंतोष, आरोपींना त्वरित अटक करण्याची व पीडितांना तातडीने आर्थिक मदत करण्याची आवश्यकता."

**नऊ : प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री. नवाब मलिक, विजय वडेट्टीवार, जयप्रकाश दांडेगावकर, गोपालदास अग्रवाल, पृथ्वीराज साठे, सुभाष झनक, ॲड.अशोक पवार, डॉ.नामदेव उसेंडी, सर्वश्री.चंद्रशेखर घुले, सुभाष धोटे, ॲड.यशोमती ठाकूर, सर्वश्री राजीव सातव, केवलराम काळे, डॉ.अनिल बोंडे, श्री.बच्चू कडू, वि.स.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

विदर्भातील प्रकल्पांना पंतप्रधान पॅकेज/ AIBP अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात येत असताना प्रकल्पांची कामे अद्याप अपूर्ण असणे, सन २०१२-१३ मध्ये विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील सुमारे रू.१२०० कोटी निधी अद्यापही अखर्चित असणे, अप्पर वर्धा प्रकल्पांतर्गत २१,९९८ हेक्टरच्या पाटचऱ्या कामांना २ वर्षापासून मंजुरी असताना अद्यापही पाटचऱ्यांची कामे करण्यात न आल्याने प्रकल्पात मुबलक पाणी असूनही शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी न मिळणे, याच

प्रकल्पांतर्गत मंजूर पाथरगाव उपसा जलसिंचन योजनेच्या कामास सुरूवात करण्यात न येणे, केंद्र शासनाचे प्रकल्पाचे पाणी केवळ सिंचनासाठी देण्याचे बंधन असताना विदर्भातील सिंचन प्रकल्पाचे पाणी खाजगी वीज प्रकल्पांना विकण्याचा करार शासनाने करणे, यामुळे लाखो हेक्टर जमीन सिंचनापासून वंचित होणे, यामुळे विदर्भ, मराठवाड्यावर अन्याय होणार असल्यामुळे विदर्भ व मराठवाड्यातील जनतेमध्ये प्रचंड असंतोष पसरणे, विदर्भातील शेतकऱ्यांना पिकांचे अवकाळी पाऊस, गारपीट, अतिथंडी यामुळे झालेल्या नुकसानीचे शासनाकडून अनुदान न मिळणे, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून कृषी पंप पुरवठ्यासंबंधी ॲप्लीकेशन पेड पेंडींग व ॲडव्हाईज पेड पेंडींग मध्ये वीज पंप धारकांची दिशाभूल करण्यात येणे, ग्रामीण भागातील रस्ते विकासाचा प्रचंड अनुशेष असणे, यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागत असणे, जिल्हा परिषदेमार्फत होणाऱ्या कामांचा दर्जा अत्यंत खराब असणे, जिल्हा परिषदांमध्ये विविध पदे रिक्त असल्याने कामांना प्रचंड विलंब होणे, आरोग्य विभागांतर्गत अनेक पदे रिक्त असणे, यामुळे आरोग्य विभागच आजारी असल्याचे चित्र निर्माण होणे, याबाबत राज्यशासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**दहा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार दिनांक १८ डिसेंबर, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ४)**

(१) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

**"अपंगांच्या कल्याणासाठी राज्य शासनाने तयार केलेल्या अपंग विकास कृती आराखड्यासाठी केलेल्या तरतुदीची अंमलबजावणी केली नसल्याबाबत"** या विषयावरील **श्री.अमीन पटेल व इतर वि.स.स.** यांचा दिनांक २० जुलै, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४१६ मधील प्रश्न क्रमांक ६७५१५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्री.विवेक पंडित, वि.स.स.**

**"वसई (जि.ठाणे) येथील शासकीय खाजण जमिनीवरील तिवरांची झाडे तोडून तेथे बेकायदेशीर बांधकाम केल्याबाबत"** या विषयावरील **श्री.विवेक पंडित व इतर वि.स.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ८६०४७ ला दिनांक २३ जुलै, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(३) **श्री. सुरेश हाळवणकर, वि.स.स.**

**"यंत्रमाग कामगारांच्या घरकुल योजनेबाबत"** या विषयावरील **श्री.सुरेश हाळवणकर व इतर वि.स.स.** यांचा दिनांक १९ एप्रिल,२०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ३७५ मधील प्रश्न क्रमांक ६१२८६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात **अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.**

(४) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

**"चंद्रपूर जिल्ह्यातील हुमन नदी प्रकल्पाच्या नेट प्रेझेंट व्हॅल्युच्या रकमेमध्ये वाढ झाल्याबाबत"** या विषयावरील **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७९३८१ ला दिनांक २५ जुलै, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात **अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.**

**(मंगळवार दिनांक १२ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) (क्रमांक ५)**

(५) **श्री.एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील), वि.स.स.**

**"नागपूर शहरात चोरी, खून, दरोडा, घरफोडी,चैनस्नेचींग या सारख्या प्रकरणांमध्ये वाढ झाल्याबाबत"** या विषयावरील **श्री.देवेंद्र फडणवीस व इतर वि.स.स.** यांच्या दिनांक १९ डिसेंबर, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ४९६ मधील प्रश्न क्रमांक ७०७०५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(सोमवार, दिनांक १८ मार्च, २०१३ रोजीच्या बॅलेटद्वारे ठरविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक ६ व ७)**

(६) **श्री. सुधाकर भालेराव, वि.स.स.**

**"राज्यातील भूविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांना अनेक महिने पगार व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युइटी व इतर देणी मिळाली नसल्याबाबत"** या विषयावरील **श्री.अशोक पवार व इतर वि.स.स.** यांचा दिनांक २१ डिसेंबर, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ५१८ मधील प्रश्न क्रमांक ७८६०३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(७) **श्री. सरदार तारासिंग, वि.स.स.**

**"नागपूर शहरातील विकास योजनेतील हरितपट्टयातील अंतर्गत असलेले भूखंड गुंठेवारी अधिनियम, २००१ नुसार कार्यवाही करण्याबाबत"** या विषयावरील **श्री.देवेंद्र फडणवीस व इतर वि.स.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १०१६२३ ला दिनांक १२ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १८ मार्च, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.